**<u>सदर साक्ष नोंदवितांना आरोपी न्यायालयासमक्ष व्ही.सी.द्वारे हजर.</u>**

**<u>नियमित फौजदारी ख. क्र. ४०४/२०२५.</u>**
**निशाणी क्र. ०६/क**
**सरकार वि. सुकदेव तडवी**
**<u>फिर्यादी.</u>**

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.०१.</u>**

मी शपथेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | : | आशिष प्रकाश जैन |
| वय | : | ४५ वर्षे |
| धंदा | : | खाजगी नोकरी |
| राहणार | : | शिरपूर, ता. शिरपूर, जि. धुळे. |

**<u>सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. आर. ए. पाडवी यांचेकडूनः</u>**

१. दि. २७.१२.२०२४ रोजी सायंकाळी ०६.०० ते ७.४५ च्या दरम्यान माझ्या एचएफ डिलक्स दुचाकी गाडी क्र. एमएच–१८–एयु–२६७७ च्या चोरीची घटना घडली. सदर गाडी करवंद नाक्यावरील शकुंतला लॉन्सच्या गेटबाहेरुन चोरीला गेली. मी व दोन ते तीन मित्र असे मिळून गाडीचा करवंद नाक्यावरील रस्त्यावर शोध घेतला. परंतू, गाडी मिळून आली नाही. त्यानंतर मी शिरपूर पोलीस स्टेशन येथे आलो व गाडी चोरीला गेली असे सांगितले. मग पोलीस म्हणाले की, २ ते ३ दिवस आपण शोधू व त्यानंतर फिर्याद दाखल करु.

२. त्यानंतर दि. ३१.१२.२०२४ रोजी अज्ञात चोरटयाविरोधात मी फिर्याद दाखल केली. ती फिर्याद दाखवली असता मी ओळखु शकतो. आता मला फिर्याद दाखवली. ती तीच असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. **<u>फिर्याद</u>** हिस **<u>निशाणी क्र. पी–१/पीडब्लु–१</u>** देण्यात येत आहे.

३. पोलीसांनी माझ्या तक्रारीच्या अनुषंगाने गाडीचा शोध घेतला. दिनांक २५.०६.२०२५ रोजी मला पोलीसांचा फोन आला की, शहादा पोलीस स्टेशन येथे माझी गाडी जमा आहे. मी तपासी अधिकारी चेतन सोनवणे यांना भेटलो. मी विधिज्ञांमार्फत शिरपूर न्यायालयात माझी गाडी मिळणेबाबत अर्ज केला. त्या अर्जानुसार मला माझी गाडी परत मिळाली. त्याबाबत मी स्टॅम्प लिहून दिला होता. आता मला सदर स्टॅम्प दाखवला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **<u>सुपुर्तनाम्यास</u>** **<u>निशाणी क्र. पी–२/पीडब्लु–१</u>** देण्यात येत आहे. पोलीसांनी गाडी परत करत असतांना माझा फोटो काढला. आता मला सदर **<u>फोटो</u>** दाखवला. तो तोच असून त्यास **<u>आर्टीकल–अ/पीडब्लू–१</u>** देण्यात येत आहे.

POOJA NARAYAN KOKATE
Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2026.01.02 15:25:14 +0530

४.	तपासादरम्यान पोलीसांनी मला विचारपूस केली होती. माझी मोटारसायकल आरोपी तडवी याने चोरल्याचे मला पोलीस चेतन सोनवणे यांनी सांगितले. आरोपी तडवी हा कुठला राहणारा आहे हे मला माहीत नाही. आरोपीस मी पाहिलेले नाही. त्याचा मी फोटो पाहिलेला आहे. मी आरोपीचा फोटा पाहिला असल्याने त्यास आज रोजी दाखवले असता मी ओळखु शकतो. आता मला न्यायालयासमोरील व्ही.सी. द्वारे सुरु असलेल्या स्क्रीनवर जेल प्रशासनामार्फत आरोपी दाखविण्यात आला. सदर आरोपी हा तोच आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस.जे. पाटील यांच्यामार्फतः</u>**

५.	हे म्हणणे खरे आहे की, तीन ते चार दिवस गाडी न मिळाल्यावर पोलीसांनी मला बोलाविले व फिर्याद देवून टाका असे मला म्हणाले. दि. २५.०६.२०२५ रोजी मला शहादा पोलीस स्टेशन येथून वाघ पोलीस यांचा फोन आला होता. त्यानंतर मी शहादा येथे माझी गाडी पाहण्यासाठी गेलो होतो. शहादा येथील पोलीसांनी गाडीबाबत माझा जबाब घेतला नव्हता. त्यानंतर ती गाडी मी दोन महिन्यानंतर पाहिली. त्यावेळेसही माझा जबाब घेण्यात आला नाही. शहादा येथील पोलीस राजपूत यांना मी दोन वेळेस भेटलो होतो. दोन्ही वेळेस मी ती गाडी पाहिली. त्यानंतर मी व पोलीस चेतन असे न्यायालयाच्या आदेशाने गाडी घेण्यास शहादा येथे गेलो. शहादा येथे गाडी ताब्यात घेतल्याबाबत पोलीस चेतन यांनी पंचनामा केला.

६.	हे म्हणणे खरे  आहे की, ती गाडी शहादा येथून ताब्यात घेतल्यानंतर मी घरी घेवून आलो. हे म्हणणे खरे आहे की, गाडी मिळाल्यानंतर शिरपूर व शहादा या दोन्ही पोलीस स्टेशनला माझे जाणे झाले नाही. आरोपीचा फोटो पोलीसांनी मला आता दाखवला. हे म्हणणे खरे आहे की, त्यांनी सांगितले की, हा जो फोटो आहे त्याप्रमाणे टी.व्ही.त दाखविलेल्या आरोपीला ओळखायचे. हे म्हणणे खरे  आहे की, त्यांच्या तशा सांगण्याप्रमाणे मी आज रोजी आरोपीला ओळखले. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद दिल्याशिवाय मला गाडी मिळणार नव्हती म्हणून मी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

POOJA NARAYAN KOKATE
Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2026.01.02 15:25:20 +0530

शिरपूर.
दिनांक  ०२.०१.२०२६.

(श्रीमती पूजा ना. कोकाटे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र.१),
शिरपूर, जि. धुळे.
**JO Code-2489**